महत्वाचे - विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे – ४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune.com

जाक्र./प्रशिक्षण-५/कें.प्रवेश.प्र.वि./१२-१३/ 91090 8/6 दिनांक- १९.६.२०१२ JUN 2012

प्रति,

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
लोणीकाळभोर-ता.हवेली जि.पुणे/
ता.संगमनेर-जि.अहमदनगर/ वेळापूर ता.माळशिरस, जि.सोलापूर

विषय- डी.टी.एड.प्रथम वर्ष प्रवेश २०१२-१३ केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून विदयार्थी पुरविणेबाबत..

संदर्भ- मा.संचालक, मराशैसंप्रप पुणे यांचेकडील पत्रक्र.१५९३ दि. १४.६.२०१२ चे पत्र.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, सन-२०१२-१३ या शैक्षणिक वर्षात डी.टी.एड.प्रथम प्रवेशासाठी केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश अर्जाची विक्री व स्विकृती खूपच कमी प्रमाणात झालेली आहे. तसेच काही अध्यापक विदयालयांनी त्यांचा प्रथम वर्षाचा विदयार्थी व्यवस्थापन कोटा समर्पित करुन सदर जागा केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून भरणेबाबत विनंती केली आहे. या वर्षासाठी शासकीय व व्यवस्थापन कोटयातील विदयार्थी प्रवेश क्षमता व प्रवेश अर्जाची स्विकृती यांचा विचार करता जवळ जवळ १/३ इतक्या जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे.

केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश मिळण्यासाठी अर्ज केलेला विदयार्थी अध्यापक विदयालय, आपल्या पसंतीनुसार निवड करीत असल्याने काही अध्यापक विदयालयात पुरेसे क्षमतेइतके प्रवेश होण्याची शक्यता कमी आहे. तसेच अशा कमी विदयार्थ्यांवर अध्यापक विदयालय चालविण्याची क्षमता ज्या संस्थाकडे नाही, अशा संस्थापकांकडून लेखी स्वरुपाचे पत्र किंवा त्यांचे म्हणणे प्राप्त करुन घ्यावे. व ते विभागीय प्रवेश प्रक्रिया प्रथम फेरी सुरु होणपूर्वीच आपल्या जिल्हयातील अशा अध्यापक विदयालयांची यादी तसेच संस्थापकांचे लेखी पत्र मा.संचालक, मराशैसंप्रप पुणे-३० यांना सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

.त्यानुसार अशा अध्यापक विदयालयांना त्यांचे मान्य व्यवस्थापन कोटयातील प्रवेशही देता येणार नाहीत. व या वर्षासाठी केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतील केलेला समावेश रदद केला जाईल. व तसे शासनास व एन.सी.टी.ई. भोपाळ यांना कळविले जाईल.

केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून विदयार्थ्यांने प्रवेशासाठी अध्यापक विदयालयाची निवड केल्यानंतर जर अध्यापक विदयालय बंद करणेबाबत संबंधित संस्थापकांनी कळविल्यास इतर अध्यापक विदयालयात सदर प्रवेशित विदयार्थ्यांचे समावेशन करणेबाबत अडचणी निर्माण होतील. तसेच मध्येच अध्यापक विदयालय बंद करता येणार नाही. त्यानुसार आपल्या जिल्हयातील अध्यापक विदयालयास तात्काळ कळवून वरील सूचनेनुसार केंद्रिय प्रवेश प्रक्रियेत समावेश करु इच्छित नसलेल्या अध्यापक विदयालयांची यादी तात्काळ विभागस्तरावरील प्रथम फेरी सुरु होणेपूर्वीच या कार्यालयास तसेच मा.संचालक, मराशैसंप्रप पुणे-३० यांना सादर करण्यात यावी.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर-
: मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिवपेठ, कुमठेकर मार्ग, पुणे-३०.